नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 01/09/2021 (बुधवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

1) पो.स्टे. बुटीबोरी :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर शनी मंदीर बुटीबोरी नागपूर ते चंद्रपुर येथे दिनांक 31/08/2021 चे 00.30 वा. ते 01.45 वा. दरम्यान बुटीबोरी पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन बुटीबोरी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. पी.– 09/ जीएच – 0866 क्रमांकाच्या आयसर गाडीला थांबवुन गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये एकुण 07 बैल कि. 84,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी नामे क्र. 1. नेहाल खोब्रागडे वय 25 वर्ष रा. मालीपार जि.भंडारा, 2. राकेश कुंभलकर वय रा.भंडारा व 3. महेंद्र चव्हाण, रा. इंदोर मध्यप्रदेश यांच्या ताब्यातुन एम. पी.– 09/ जीएच – 0866 क्रमांकाच्या आयसर गाडी कि. 7,00,000/–रू. व 7 जनावरे असा एकुण किंमती 7,84,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक मयुर ढेकले, पो.स्टे. बुटीबोरी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बुटीबोरी येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ)9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, सहकलम 109,666,192,130,83,177 भादवी तसेच कलम 66/192, 130/177, 83/177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवलदार संजय बांते 9552786920 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अपर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी नागपूर विभाग श्री. राजेन्द्र चव्हाण यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोलिस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवलदार संजय बांते, नापोशी मयुर ढेकले, पोशी विनायक सातव, विवके गेडाम व चालक पोहवा भगत यांनी केलेली आहे.





2) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 14 कि. मी. अंतरावरील बाजारगांव शिवार एन.एच.53 रोड अनंततारा हॉटेलसमोर येथे दिनांक 30/08/2021 चे 19.45 वा. ते 20.03 वा. दरम्यान आरोपी चालक नामे– शेख हुसेन शेख अहमद वय 22 वर्ष रा. वडगाव खुर्द ता.जि. औरंगाबाद याने त्याचे ताब्यातील एम.एच–20/ई.एल–5187 क्रमांकाच्या आयशर गाडी मध्ये 13 म्हशी व 1 हल्या भरून त्याचे पाय दोरीने एकमेकांना बांधुन निर्दयपने वाहनात कोंबुन नागपुर वरून औरंगाबाद कडे वाहतुंक करतांना वाहन चालक आरोपी याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन चालकाचे गाडीवरील नियंत्रन सुटल्याने आयशर गाडी पलटी झाली. त्यामुळे गाडीतील 3 म्हशी जखमी झाल्या. वाहनातील 13 म्हशी व 1 हल्या असा एकुण कि. 2,80,000/–रू. चा व वाहनासह एकुण 9,80,000/–रू. चा माल अवैध्यरित्या जनावराची वाहतुक करून अपघात करतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई सुखदेव धुळधुळे, पो.स्टे. कोंढाळी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(अ)(ड)(ई)(फ) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 279 भादवी तसेच कलम 184 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवलदार रविन्द्र बकाल 9767436071 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर